# प्रकरण तिसरे

## अनंत काणेकरांच्या " खडक कोरतात आकाश " पुस्तकाचा अभ्यास -

## प्रकरण तिसरे

### अनंत काणेकरांच्या " खडक कोरतात आकाश" पुस्तकाचा अभ्यास --

**उपोद्घात:**

अनंत काणेकरांची " धुक्यातून लाल ता-याकडे " ," आमची माती आमचे आकाश ", " निळे डोंगर तांबडी माती", " सोनेरी उन्हात पाचूची बेटे", "रक्ताची फुले", " खडक कोरतात आकाश " ही प्रसिध्द पुस्तके आहेत. "निळे डोंगर तांबडी माती " हे प्रवासवर्णन व त्यात चित्रकार दलालाबरोबर केलेला दक्षिण भारताचा प्रवास चित्रित झाला आहे तर " खडक कोरतात आकाश " हे पुस्तक अमेरिकेचा प्रदेश व्याप्ते.

दोन देशातील सांस्कृतिक अध्यात्मिक, ऐतिहासिक, राजकीय, धार्मिक संस्काराच्या अनुभावाचे स्वरूप वेगळे असल्यामुळे या दोन पुस्तकांचा स्वतंत्रारित्या अभ्यास करावयाचा आहे.

"खडक कोरतात आकाश " हे काणेकरांचे सहावे प्रवास वर्णन आहे. यात कांही भारतीय साहित्यिक पत्रकार आणि साहित्यिकाबरोबर अमेरिकेच्या निरनिराळ्या प्रदेशातून प्रवास करीत असताना आलेले अनुभव त्यांनी या पुस्तकात लेखारूपाने दिले आहेत. अमेरिकेतील मानवतावादी दृष्टीकोन, त्यांची भारताकडे पाहण्याची भूमिका त्यांचा जीवनक्रम, अमेरिकेच्या निरनिराळ्या प्रदेशांना प्राप्त झालेले पृथक व्यक्तिमत्त्व याचे दर्शन काणेकरांनी कलात्मकरूपाने कसे घडविले आहे याचा अभ्यास आपणाला या पुस्तकाच्या अनुषंगाने करावयाचा आहे.

"खडक कोरतात आकाश " शीर्षकाची समर्पकता --

" काणेकरांचे पुस्तक त्यांच्या नावापासूनच मोठे वैशिष्टयपूर्ण असते." [१] वैभवसंपन्न अशा इमर्सन, थोरो यासारख्या विचारवंतांच्या ह्या भूमीचा विचार करताना त्यांच्यापुढे अमेरिकेचे प्रतीक असे न्यूयॉर्क शहर उभे राहते ते ज्या मॅनहेटन बेटावर उभे आहे " ते संबंध बेट म्हणजे तांबूस काळ्या रंगाच्या ,अत्यंत कठीण म्हणून प्रख्यात असलेल्या ग्रॅनाईट खडकाचे आहे. आणि ह्या खडकावर शेंकडो मजल्यांच्या आकाश भेदून टाकणा-या न्यूयॉर्कच्या इमारती म्हणजे पायातल्या त्या तांबूस काळ्या ग्रॅनाईट उभ्या असलेल्या खडकाचेच निळ्या आकाशात खुपसलेली बोटे वाटतात ( पृ.९ खडक कोरतात आकाश ) आणि म्हणूनच ते आपल्या पुस्तकाला नाव देतात " खडक कोरतात आकाश " या काव्यमय शीर्षकामागे त्यांचे निसर्ग प्रेमी मन आहे. या मनाच्या उत्कट अनुभूतीचे वर्णन काणेकरांना करावयाचे आहे.

अमेरिकेबद्दल कल्पना -

लोकशाहीवादी अमेरिका भांडवलदार अमेरिका लिंकनची अमेरिका, शिकागोतल्या डाकूंची अमेरिका , हॉलिवूडच्या चित्रपटांतील अमेरिका, विवेकानंद, ज्ञानकोशकार केतकर ,लाला लजपतराय, जयप्रकाश नारायण यांना आश्रय देणारी अमेरिका , निग्रोंना जिवंत जाळणारी अमेरिका आणि सर्व जगाला सहस्त्र हस्तानी कोट्यावधी डॉलरांची मदत देणारी अमेरिका, त्याशिवाय इमर्सन थोरोसारख्या तत्ववेत्यांच्या लिखाणातली अमेरिका, मार्कट्वेन ,वॉल्ट व्हिटमन, ड्रायझर, सिंक्लेअर लुई, हेमिंग्वे, फॉकनर, कॉल्डवेल, स्टाईनबेक, टेनेसी विल्यम्स, आर्थर मिलर यांच्या - सारख्या कवि, कथाकार, नाटककार, कादंबरीकार यांच्या पुस्तकांतून मनात मुरलेली अमेरिका , तिथल्या मिसिसिपीसारख्या महान् नद्या, ग्रँड कॅन्यनसारखी द-या - खोरी, नायगारा धबधबा ,नाना प्रकारची हवामाने असलेला ,नाना धान्ये अमूप पिकवणारा पेट्रोल ,लोखंड इत्यादींनी संपन्न असलेला अवाढव्य भूप्रदेश हा अमेरिकेचा भूगोल आणि ब्रिटीशांशी वॉशिंग्टनने केलेला अमेरिकेचा स्वातंत्र्य -

संग्राम, नीग्रो गुलामांच्या मुक्ततेसाठी लिंकनने केलेले स्वातंत्र्य युध्द इत्यादी पाहण्याची तीव्र इच्छा होती , ती " अमेरिकन न्यूजपेपर्स स्टडी मिशान्य इन्कॉर्पोरे- - टेड" या अमेरिकी संस्थेच्या कृपेने पुरी झाली असे काणेकरानी संस्थेचे ऋण मानले आहे ,"( पृ. १७- खडक कोरतात आकाश )

१) वैभवसंपन्न राष्ट्र -

अमेरिका हे एक अत्यंत श्रीमंत आणि समृध्द राष्ट्र आहे. त्याना विपुलतेची जन्मापासूनच इतकी सवय झाली आहे की सर्वसामान्य माणसाजवळ इतके असणे गरजेचे आहे असे अमेरिकनाची कल्पना आहे, त्यामुळे तिथे " श्रीमंतीचा ताठा किंवा गर्व कुठे आढळत नाही. एकप्रकारचा साधेपणा आणि उदारता त्यांच्यात आलेली आहे."

२) अमेरिकनावर निसर्ग फिदा आहे -

नानाप्रकारच्या हवामानांचा नाना अन्नधान्ये ,फळफळावळ पिकवू शकणारा, पेट्रोल, लोखंड, जस्त, तांबे, सोने , रूपे, इत्यादी भरपूर साठे भूगर्भात असलेला अवाढव्य प्रदेश अमेरिकनांना दैवयोगाने प्राप्त झाला पण " दैवयोगाने ते श्रीमंत झाले नाहीत "( पृ. १५ ) या प्रदेशातला कणनूकण अंगमोडून, वाटेल ते काम करून आणि रात्रंदिवस घामगाळून त्यानी बाहेर काढला आणि आपला देश सर्व जगातला अत्यंत संपन्न, अत्यंत पुढारलेला देश करून टाकला त्यामुळे श्रीमंतीचा ताठा त्यांच्यात आलेला नाही.

३) व्यव्हारवादी दृष्टकोण --

कोणतेही काम असो भांडी-धुण्याचे की बुट पुसण्याचे असो, कामाबद्दल त्यांना सारखाच आदर वाटतो. याबरोबरच एक प्रकारचा व्यव्हारवाद आणि उथळपणाही त्यांच्यात आलेला आहे.

मनापासून केलेल्या श्रमाना यश आल्यामुळे जे यशस्वी ते चांगले जे उपयुक्त ते सत्य असलेच पाहिजे असे त्यांना वाटते. आणि ज्याला यश मिळत नाही, जे उपयुक्त होत नाही ते वाईट किंवा असत्य असले पाहिजे असा त्यांचा ग्रह होतो" .

४) अभावता -

सद्हेतूनी सत्कार्य करीत असताही अनेक अपयशे आलेल्या, व्यावहारिक उपयुक्तता शून्य असूनही " मनाला अलौकिक आनंद देणारे अनेक अनुभव घेतलेल्या एखाद्या माणसामध्ये जी चिंतनशीलता ,जी स्थितप्रज्ञता दिसते ती सर्वसामान्यपणे इथे दिसत नाही" अगदीच नाही असे अर्थात मुळीच नाही.

अमेरिकेसारखी वैभव संपन्न जीवन पाहताना काणेकरांची भूमिका ही निव्वळ नवलाईची कौतुकाची नाही तर देशादेशातील संस्कृतीमधाले अंतर यथार्थ रितीने पाहण्याची दृष्टी देऊन जाते.

काणेकरांचे प्रवासवर्णनात्मक लेखन हे केवळ त्या त्या प्रसंगाचे व स्थळाचे रेखाटन अशा स्वरूपाचे रहात नाही, त्यांच्या सा-या लेखनामध्ये त्यांच्या व्यक्तित्वाचे रंग बेमालूमपणे मिसळून जातात. काणेकर हे कोणाशीही इतक्या लवकर समरस होतात की ते ज्याच्या ज्याच्या सहवासात येतात त्याला ते जवळचे मित्रासारखेच वाटतात कारण " त्यांचे अंभाषण बोचारे नाही तसेच प्रदर्शनात्मकही नाही हे विशेष आहे."[२] उदा. अमेरिकेत काणेकराना एकदा एक म्हातारी म्हणाली " तुम्हाला हे आवडलं , ते आवडलं ठीक आहे आता आमच्या अमेरिकेत तुम्हाला काय आवडलं नाही ते सांगा बघू ? काणेकर हसून म्हणाले तुमचं बर्फ खाण्याचे वेड, ती मनापासून हसली" ( पृष्ठ १७ )

सॅनफ्रॅन्सिस्कोत चिनी, जपानी, फिलिपिनी पुष्कळच आहेत. या सर्वांचेच डोळे बारीक आणि चेहरे बसकट असल्यामुळे कोण चिनी आणि कोण फिलीपिनी नवीन माणसाला कांहीच कळत नाही. तिथं झालेली एक गंमत काणेकर सांगतात, " जंगातल्या सगळ्या न्हाव्याप्रमाणे ती गोष्टीवेल्हाळ होतात, ती म्हणाला साहेब तुम्ही भारतातले, नाही का ? "हो " मी म्हणालो . तुमच्यासारख्या भल्या लोकावर या चिन्यांनी काय म्हणून हल्ला केला हो ? त्याने विचारले . मला जरा रागच आला त्याचा. मी म्हणालो, लेका, तू चिनी नि मला विचारतोयस चिन्यांनी हल्ला का केला म्हणून ? ती एकदम हसला नि म्हणाला साहेब मी चिनी नाही, मी फिलिपिनी आहे. नि अमेरिकेचा नागरिक झालोय! माफ कर हं मी

म्हणालो, तुम्ही सगळेच सारखे दिसता बुवा। हे चिनी लेकाचे बदमाषाच। तो म्हणाला आम्हा फिलिपिनी लोकांना ते चांगल माहीत आहे. तुम्ही त्यांना हाकलून द्याल याबद्दल मला शंका वाटत नाही. थँक्स अ लॉट मी म्हणालो." ( पृष्ठ ६८ ) " काणेकर हे बहुश्रुत आहेत हे खरेच परंतु त्याना कोठे काय कसे बालावे हे अगदी सहजगत्या कळते."[3]

अमेरिकेतील निसर्ग –

जगातील दोन नैसर्गिक आश्चर्ये अमेरिकेत आहेत. त्यापैकी एक नायगारा हा अजस्त्र धाबधाबा आणि दुसरे "ग्रॅन्ड कॅन्यन" .

ग्रॅन्ड कॅन्यन –

ग्रॅन्ड कॅन्यन म्हणजे ॲरिझोना या एका राज्यातून उटा या दुस-या राज्यापर्यन्त दीडदोनशे मैल पसरलेल्या द-याखो-यांनी भरलेल्या डोंगराच्या रांगा नव्हेत. लालपिवळसर काळ्या रंगाच्या खडकाचे दीडदोनशे मैल पसरलेले विस्तीर्ण पठार कोट्यावधि वर्षापूर्वी कोलोरॅडो नदीच्या प्रचंड प्रवाहाने आणि इतर नैसर्गिक घडामोडींनी मोडले, तोडले, खोदले गेले आणि मैल मैल खोल आणि कित्येक मैल लाबरूंद अशा द-या आणि खडकाचे डोंगर निर्माण झाले. एखाद्या कड्यावर उभे राहून पलीकडे पाहिले की क्षितिजापर्यन्त पसरलेल्या केव्हा निळसर तर केव्हा लालपिवळसर प्रकाशाने भरलेल्या या अजस्त्र द-या, आणि खडक कापून निसर्गाने उभी केलेली ही डोंगराएवढी लालपिवळसर अस्त्रा गोपुरें नजरेच्या आवाक्यात मावतच नाहीत. ती रंगीबेरंगी अफाटपणा आणि ती खडकाळ भव्यता अक्षरशः " आ " वासून पाहात राहावीशी वाटते. दुर्बिणीने पाहिले तर दरीच्या तळाशी एखाद्या रेड इंडियन खेड्यातल्या काही झोपडीवजा घराची रूपरेषा आणि हिरव्या झाडांचे कांही पुंजके दिसतात. दुस-या एखाद्या दरीच्या तळातून वळणे घेत जाणारा कोलोरॅडो नदीच्या पाण्याचा अजस्त्र प्रवाह पाचसहा फूट रुंदीच्या पट्ट्याएवढा दिसतो।

"गोपुरे असे मुद्दामच म्हणालो : कारण अमेरिकी भूस्तरशास्त्रज्ञांनी या पर्वत प्राय लालसर पिवळ्या खडकांच्या पसा-यातल्या एकाला "ब्रम्ह टेंपल "

एकाला " विष्णु टेंपल " एकाला " शिव टेंपल " एकाला " बुध्द टेंपल " एकाला "कॉन्फ्युशियस टेंपल " तर दुस-या एकाला " झरतुष्ट्र टेंपल" अशीच नावे दिली आहेत। अमेरिकन भूगोलांतही ही अधिकृतरित्या दिलेली भारतीय नावे पाहून आम्ही आश्चर्यचकित झालो". ( पृष्ठ ६० )

गोल्डन गेट पार्क -

झुलत्या तारावर आधारलेला हा भव्य पूल आहे. मोठमोठ्या आगबोटी याच्या खालून सहज जाऊ शकतात.

शो-सव्वाशे एकर पसरलेले फ्रिस्कोचे प्रख्यात "गोल्डन गेट पार्क " हे हिरवेगार उपवन आहे. पूर्वी ही सर्व रेताड जमीन होती म्हणे. "एक स्कॉटिश गृहस्थ १८८८ साली इथे येऊन स्थायिक झाला त्याच्या एकट्याच्या चिकाटीने आणि परिश्रमानी उष्ण कटिबंधातलीही फुले जिथल्या खास जाळीदार पुष्प - गृहात पहावाला मिळतात असे हे प्रचंड उपवन तयार झाले . स्थानिक अधिका-याच्या, नगरपालिकेच्या खानपटोला बसून त्या स्कॉचमनने रेताड जमिनीचे सुंदर उपवनात रूपांतर करवून घेतले" ( पृ. ६६ ) फ्रिस्कोचे नागरिक अजूनही त्याचे नाव आदराने घेतात.

जपानीज टी गार्डन -

जपानीज टी गार्डन नांवाचे जपान्यांचे एक चहापानगृह आहे. जपानी बागेचे वैशिष्टय म्हणजे तिच्यात कृत्रिम आखीवपणा नसतो. इकडे तिकडे खडक पसरलेले , त्यांच्यावर एखादा चिमुकला लाकडी पूल , त्याच्याखालून झुळझुळ वाहणारा ओढा हे सर्व कृत्रिम असले तरी स्वाभाविक दिसेल असे केलेले असते.

" या बागेत बसून आपल्या रंगीबेरंगी किमोनात तुरूतुरू चालणा-या हंसतमुख जपानी मुलीनी दिलेली जपानी चहा आम्ही घेतला. इथल्या एका दालनात मुलांची खेळणी ,काचेच्या नाजुक कपबश्या ,फुलदाण्या वगैरे वगैरे सुंदर सुंदर जपानी वस्तू विकायला ठेवलेल्या आहेत." ( प. ६७ )

काणेकराना संध्याकाळ पर्यन्त विल्यम्सबर्ग गाठावयाचे होते अशावेळी

रस्त्यात दिसणारे गावाचे वर्णन करतात. अमेरिकेचे विस्तीर्ण माळ, जाळीदार तारांच्या चौकडीची कित्येक फर्लांग लांब व्यवस्थित कुंपणे असलेली गुरे-ढोरे, घोडी चरावयाची कुरणे, टुमदार घरांची छोडेवजा गावे "स्वच्छ उन्हात न्हाहुन निघणारे निळेशार आकाश त्यात संथपणे फिरणारे पांढरे ढग, मैलच्या मैल सरळ धावणारे निर्जन रस्ते, आजूबाजूच्या कुरणात आरामात चरणारी एखादी दुसरी तांबडया पांढ-या ठिपक्याची गाय किंवा राखी रंगाचे एखादे शिंगरू." ( पृ. ४४) " काणेकरानी प्रवासात जे पाहिले जे अनुभवले जे जाणवले ते सजावट बनावट नकरता नमूद करताना दिसतात"[४].

अमेरिकेचा निसर्ग पहात असताना "ग्रॅन्ड कॅन्यन " नायगारा हा अजस्त्र धबधबा ठिकठिकाणी दिसलेल्या निसर्गाचे वर्णन वाचले तर या प्रवासवर्णनामध्ये त्यांच्यातला कवी सहजपणे प्रगट झालेला दिसतो. त्यामध्ये कल्पनाविलास किंवा सौन्दर्याचा नाटकी आविष्कार नाही. डोळ्याना दिसलेली निसर्गशोभा सौंदर्यानुभाव नमूद करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात.

अमेरिकनांना बर्फाचे वेड अतिशय असल्याचा उल्लेख काणेकर करतात पण त्याचबरोबर हेही जाणवून देतात की अमेरिकनाचे अंत:करण स्नेहाळ, धागधागीत आहे. त्याचबरोबर "स्वच्छ सूर्यप्रकाशात झळझळणारा पांढ-या ढंगाचा क्षीराब्धीच दिसत होता " ( पृ. २४ ) यातून काणेकरांची निसर्ग सौंदर्य आस्वादण्याची जाणीव लक्षात येते. आपल्याकडे शिशीर ऋतु असे म्हटले जाते तर अमेरिकी इंग्रजीत या ऋतुला " फॉल " किंवा " पानझड " असेच नाव आहे " ( पृ. ३३ )

हे सर्व लक्षात घेता काणेकरांचा मन:पिंड हा कविमनाचा असल्याने निसर्गातील काव्यही तितक्याच सूक्ष्मरितरने टिपतात. आस्वादतात निसर्ग वर्णन करताना ते अधिक आनंदी वाटतात.

राजकीय परिस्थिती -

काणेकराना पत्रकार म्हणून अमेरिकेचा प्रवास करण्याची संधी मिळाली. काणेकर पत्रकार आणि राजकारणी असल्याचे आपल्याला या पुस्तकातील राजकीय मतावरून दिसून येते. विलिमिंग्टन हॉटेलातल्या रिपब्लिकन पक्षाच्या

कचेरीत गप्पा गोष्टी करीत असताना झालेली गंमत सांगताना काणेकर म्हणतात " छानदार कपडे केलेला, शुभ्र केसाचा एक गमत्या म्हातारा नेहरू संबंधी बोलता बोलता म्हणाला " Has your Nehru learnt his lesson " तेव्हा हसत हसतच पण एकदम तडकावून त्याला म्हटलं " होय आमचे नेहरू चांगलाच धडा शिकले असतील पण तुम्हा अमेरिकन लोकाना तुमचा धडा शिकायला जितकी जबरदस्त किमत द्यावी लागली तितकी नेहरूंना द्यावी लागली नाही" (पृ.९६ ) वरील संवादावरून काणेकरांचा हजरजबाबीपणा आणि रोखठोकपणाही दिसून येतो. अशा अनेक उदाहरणावरून काणेकराचे जागतिक राजकारणाविषयी असणारे ज्ञान लक्षात येते.

<u>अमेरिकेच्या राजकीय इतिहासाबद्दल काणेकरांचा विचार</u> --

२० ते २३ ऑक्टोबर १९६२ या तीन दिवसांच्या मुक्कामात जगाला हादरून टाकणारे दोन राजकीय स्फोट एकामागून एक झाले. हिमालयाच्या परिसरात चीनने भारतावर आक्रमक मुसंडी मारल्याच्या बातम्या येऊन धडकल्या. आणि क्यूबा प्रकरण भडकून जागतिक युध्दाचा प्रारंभ - वॉशिंग्टन रशियन अणवस्त्रांचा वर्षाव आज होणार की उद्या होणार अशी परिस्थिती निर्माण झाली .

चीनच्या हल्ल्यामुळे आपलं काय होणार म्हणून आपल्या आसाममधले लोक हवालदिल झाले नसतील इतके वॉशिंग्टनमध्ये नुकतेच येऊन ठेपलेले हे पांच लेखक आणि सतरा पत्रकार त्या चार दिवसात हवालदिल झाले होते.

२० ते २४ या या चार दिवसात क्यूबा प्रकरण भडकलं होतं, नि रशियाच्या क्यूबाकडे जाणा-या बोटींनी अमेरिकी आरमाराकडून तपासणी करून घेण्याच नाकारलं तर सरळ त्याना बुडवून टाकण्याचे हुकूम अध्यक्ष केनडींनी सोडले होते, ही " नाकेबंदी करण्याचा अमेरिकेला मुळीच हक्क नाही, आमची जहाजे अमेरिकी आरमाराचे हुकूम मुळीच मानणार नाहीत अशी डरकाळी ख्रुश्चेव्ह ने

फोडली होती " ( पृ.२७ ) ७ वाजता केनेडीचे सर्व राष्ट्राला उद्देशून केलेले ते भाषण टेलिव्हिजन सेटवर ऐकली. रशिया-अमेरिकेचे युध्दच सुरू होण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. क्यूबाच्या तळावरून रशियाची क्षेपणास्त्रे अमेरिकेच्या ज्या महत्वाच्या शहरावर कांही क्षणात येऊन पडतील त्यात वॉशिंग्टन शहराला अर्थात अग्रस्थान होते.

"क्यूबा प्रकरणात रशियाने माघार घेतली नाही तर काय होईल ? आमच्या पैकी कुणी तरी विचारले, शांतपणे हॅरिमन म्हणाले " युध्द! प्रत्येक राष्ट्राला अशा प्रकारचा निर्णय केव्हा ना केव्हा करावाच लागतो आम्ही तो यावेळी केला आहे.( पृ.२८ )

यूनोची इमारत -

न्यूयॉर्क मध्ये ईस्ट नदीच्या काठी " यूनोची एकूण चाळीस मजली इमारत अगदी हुबेहुब काडयांच्या उभ्या पेटीसारखी दिसते. या एकूण चाळीस मजल्यावर यूनोच्या निरनिराळ्या खात्यांच्या कचे-या आहेत" (पृ.१४० ) जगातल्या ऐंशीनव्वद राष्ट्रांचे प्रतिनिधी जिथे असतात. त्या यूनोच्या आमसभेचे दालन किंवा सुरक्षा समितीच्या बैठकी होतात ते दालन वगैरे दालने आजूबाजूला लागून असलेल्या बैठया इमारतीत आहेत.

सुप्रीम कोर्ट -

सुप्रीम कोर्टाचा साधेपणा दिसून येतो याचे काणेकर उदा.सांगतात ... " बरोबर वेळेवर सरन्यायाधीश अर्कवॉरेन आणि त्यांचे आठ सहकारी स्थानापन्न झाले नवे वकील पटावर दाखल करून घ्यावयाचे होते सर कारकुनानें नाव पुकारले की, नवा वकील पुढे येऊन उभा राहयचा त्याची शिफारस करणारा एखादा जुना वकील दोन मिनिटे बोलण्याचा सरन्यायाधीश हसत मुखाने "मिस्टर... यू आर वेलकम .... " म्हणायचे आणि तो वकील मान लववून मागे जायचा पंधरावीस

तरी स्त्री पुरूषाना त्या दिवशी पटावर दाखल करून घेण्यात आले "
(पृ.३९ ) अत्युच्च अमेरिकी न्यायालयाचा कारभारही बराच ढोलीमेळीचा वाटला.

निवडणूका -

अमेरिकेतील निवडणूक पध्दतीचे स्वरूप लक्षात घेता रेडिओ ,टेलिव्हिजन व वर्तमानपत्री या शिवाय दुसरे एक प्रचाराचे साधन दिसते ते म्हणजे जाहिरातीचे फलक .

मिरवणूक ना जाहिरनामा अर्थात लहान लहान सभा कित्येक ठिकाणी होत असतीलही परंतु घोषणा ,मिरवणूक व सभा यानी दुमदुमलेले गावे कांही या दौ-यात दिसले नाही" कोठेही पताका नाहीत, झेंडे नाहीत, चितारलेल्या भिंती नाहीत,त्यावर चिकटविलेली पत्राके नाहीत. रस्त्यावर लिहिलेले नाही, रस्ताभर टांगलेले कापडाचे लांब लांब पट्टे नाहीत, आपल्या मानाने या निवडणूका चा प्रचार फिका व मिळमिळीत वाटत होता " ( पृ.९२ )

मतदान केन्द्र -

शाळांच्या इमारतीत मतदान केंद्र असते मतदार प्रथम एका फॉर्मवर आपली सही करतो " एका स्त्रीपाशी प्रत्येक मतदाराचे कार्ड असते, ती हवे ते कार्ड काढून त्यावरील व फॉर्मवरील सही तपासते सही कार्डावरील सहीशी जुळते आहे असे दिसले की , ती स्त्री त्या मतदाराला शेजारच्या टेबलावरील स्त्रीकडे पाठवते, त्या ठिकाणी मतदान करण्याच्या यंत्राचे एक छोटे मॉडेल ठेवलेले होते, ती दुसरी स्त्री मतदाराला मत कसे द्यावयाचे ते मॉडेलच्या साहाय्याने समजावून सांगे व त्याला प्रत्यक्ष यंत्र जिथे ठेवले होते तिकडे रवाना करी. तेथे तीसरी स्त्री उभी होती" ( पृ.९३ ) व ती एका मागून एक मतदाराला यंत्राच्या दरवाजातून आत सोडी".

मतदानाचे यंत्र -

सर्व पदे व त्याखाली उभे राहिलेले उमेदवार यांची नावे त्या यंत्रावर असते. मतदाराने मत देणे म्हणजे आपणास पाहिजे असेल त्या उमेदवारासाठी ठेवलेला

खिळा दाबणे, खिळा दाबिला म्हणजे मतदान होत नाही. त्याला ते बदलावयाचे असल्यास तो खिळा पूर्ववत करून दुसरा खिळा दाबता येतो.

अशा रितीने सर्व अधिकार पदाच्या उमेदवारांना मते दिली व मतदाराचे समाधान झाले की तो पडदा उघाडून बाहेर पडतो, ही पडदा उघाडण्याची जी क्रिया आहे त्याने प्रत्यक्ष मतदान नोंदविले जात असे. जोपर्यन्त मतदार पडदा उघाडीत नाही तोपर्यन्त त्याला आपली मते पाहिजे तशी बदलता येतात.

सर्वच केंद्रावर यंत्राच्या साहाय्याने मतदान होत नाही. दूरवर पसरलेल्या ज्या लहान लहान वस्त्या तेथे मतदान नेहमीप्रमाणे कागदावर खुणा करून होते. " अमेरिकेत यंत्रयुग अगदी शिगेला जरी पोहोचले असले तरी या दूरवरच्या मतदानपेट्या मतमोजणी केंद्रावर येण्यास काही दिवस लागतातच(पृ.९४)

निवडणुकीची धांदल –

आपल्याकडे कोणत्याही पक्षाच्या निवडणूक कचेरीत संध्याकाळी निवडणूक संपल्यावर मतदानाचे आकडे येऊ लागले की अशी धांदल, धावाधाव, चर्चा, टेलिफोनचे घणघणणे दिसते तसेच सर्व कांही इथे दिसते फरक इतकाच होता की " इथली कचेरी एका अलिशान हॉटेलच्या दालनात होती आणि अप-टुडेट बुटासुटात वावरणारे गोरेपान तरुण, वृध्द कार्यकर्ते हातातल्या व्हिस्कीच्या ग्लासातले अधून मधून घोट घेत, चर्चा, बडबड, ओरडाओरड करीत होते ( पृ.९४ ) आणखी हा एक महत्वाचा फरक दिसत होता, तो म्हणजे वृत्तपत्राचे बातमीदार पक्षाच्या कार्यकर्त्यांना किंवा उभ्या असलेल्या उमेदवारांना त्यांची मते किंवा अंदाज विचारीत होतेच पण त्यांच्यापैकी "कुणाला कांही घोषणा करायची असली की लगेच टेलिव्हिजनचे कॅमेरे आणि प्रकाश झोत सरसावून घराघरांत टेलिव्हिजन सेट लावून बसलेल्या नागरिकांना त्या घोषणा दृश्यासह ऐकवीत होते". ( पृ.९५ )

खरी लोकशाही –

लोकशाही राज्याचे एक वैशिष्ट तिथल्या एका प्रकारावरून एकदम

ध्यानात येते " इतकी आणीबाणीची परिस्थिती असूनही सामान्य नागरिकांचे विचार आणि उच्चार स्वातंत्र्य अगदी व्हाईट हाऊसच्या दारातही अबाधित होते ( पृ. ३६ ) गणवेशातले पोलिस किंवा हत्यारबंद पहारेकरी कुठे दिसले नाहीत, कडेकोट बंदोबस्त दिसला नाही. भव्य वृक्ष, जुनाट शांतपणे तळसळत होते. सकाळी तिकडे फिरताना लोकही तुरळक दिसत होते.

राष्ट्रपतिभवन " व्हाइट हाऊस –

नावाप्रमाणे ते पांढ-या रंगाचे आहे. पण फार जुन्या काळातले असल्यामुळे अमेरिकेच्या अध्यक्षांचे निवासस्थान म्हणून आपण केलेल्या कल्पनांच्या मानाने फार मोठे किंवा भव्य वाटत नाही. फार साधे वाटते. " आजूबाजूला, पुढल्या मागल्या दाराशी कडेकोट बंदोबस्तही दिसला नाही. गणवेशातले पोलीस किंवा हत्यारबंद पहारेकरीही आमच्या दृष्टीला कुठे पडले नाहीत" ( पृ. ३६ )

गव्हर्नर–

तपकिरी रंगाच्या साध्या सुटांत आपल्या टेबलाशी बसलेले उंच, तरतरीत , मध्यम वयस्क गव्हर्नर ॲन्डरसन एखाद्या मोठया कंपनीचा डायरेक्टरासारखे दिसत होते. गव्हर्नर म्हटल्यावर आम्हा मंडळींच्या डोळ्यांसमोर जो डतमाम येतो तो इथे कांहीच नव्हता. " आम्ही आत गेल्याबरोबर ते हास्य करीत पुढे आले आणि प्रत्येकाशी हस्तांदोलन करून तिथल्या खुर्च्या कोच पुरत नव्हते म्हणून आणखी काही खुर्च्या आणायाला त्यानी आपल्या चिटणीसास सांगितले. कॉफी ,कोका–कोला आम्हाला काय हवे ते आपल्या नोकराला आणायला सांगून ते आमच्याशी बोलू लागले" ( पृ.९१ ) भारतावरील चीनचे आक्रमण, काश्मीर, पाकिस्तानची राज्य घटना, क्यूबाची नाकेबंदी फिडेल कॅस्ट्रो इ. विषयावर काणेकरांच्या बरोबर ते अगदी मोकळ्या

मनाने कोट्या प्रतिकोट्या करीत बोलले. या पुस्तकातून अमेरिकेची राजकीय परिस्थिती पाहिल्यावर " काणेकरांचे जागतिक राजकारणाचे यथार्थ आकलन या छोट्या पुस्तकातूनही तात्काळ लक्षात येते "[5] असे प्रा. भीमराव कुलकर्णी म्हणतात.

अमेरिकेतील ऐतिहासिक वास्तू -

१) जॉर्ज वॉशिंग्टनचे घर -

१७५४ ते १७९९ पर्यन्त वॉशिंग्टन ज्या घरात राहिला होता ते त्याचे घर " माऊंट व्हरनॉन " वॉशिंग्टनपासून १५-१६ मैल आहे. हे घर आता महत्त्वाचे यात्रास्थळ झाले आहे. पटोमॅक नदीच्या काठी हिरव्यागार गवताने आच्छादलेल्या भूमीवर हे घर आहे.

वॉशिंग्टनचे दोनशे वर्षांचे हे घर आतल्या टेबले, खुर्च्या, पलंगासह जसेच्या तसे व्यवस्थित ठेवले आहे. घर तसे चिमुकले आहे " तळमजला व वरचा मजला मिळून फार तर आठ नऊ खोल्या असतील. मागल्या बाजूला पटोमॅकचे विस्तीर्ण पात्र आहे आणि आजूबाजूला गर्द झाडी असलेल्या शेकडों एकर जमिनीवर वॉशिंग्टनची फुलबाग, स्वयंपाक घर, त्याच्या कचेरीची छोटीशी इमारत , घोडागाडीचे तबेले, माळ्याचे घर वगैरे छोट्या छोट्या वास्तु आहेत " ( पृ. ३४ ) वॉशिंग्टनची अठराव्या शतकातली नक्षीकाम असलेली घोड्याची गाडी अजूनही पाहावयाला मिळते. स्वयंपाक घरातली भांडी, मांस टांगावयाचे आकडे, मांसाला धुरी देण्याची जागा वगैरे व्यवस्थित राखून ठेवल्या आहेत.

२) राष्ट्रीय समाधीस्थळ -

अर्लिंग्टन येथील लीमॅन्शन भोवतालच्या इतस्तत: पसरलेल्या जागेतील "राष्ट्रीय समाधीस्थळ " किंवा नॅशनल सिमेटरी - अमेरिकेच्या धारातीर्थ देह ठेवलेल्या योध्द्यांची आणि थोर पुरूषांची थडगी इथे आहेत. दररोज

संध्याकाळी अमेरिकेच्या अज्ञात विरांची समाधी जिथे आहे तिथे " चेंजिंग ऑफ गार्डस " किंवा पहारा बदलण्याचा मोठा गंभीर समारंभ होतो. फिरायला आलेले पुष्कळ स्त्री-पुरुष आणि मुले तिथे गमंत बघायला आलेली असतात " जुन्या त-हेचा तंग गणवेष घातलेला सैनिक संगीन लावलेली बंदूक खांद्यावर ताठ धरून टपक टपक पावले टाकीत कमरेंत लचकल्यासारखा समाधीसमोरच्या आखीव जागेत इकडून तिकडे फे-या घालीत असतो. संध्याकाळी पहारा बदलण्याची वेळ झाली की एक अधिकारी आणि तसाच गणवेष घातलेला संगीन लावलेली बंदूक खांद्यावर धरलेला दुसरा पहारेकरी तिथे येतो. अधिकारी हुकूम सोडतो, दुसरा पाहरेकरी तशीच टपक टपक पावले टाकीत पहिल्या पहारेक-याबरोबर चालतो. खाडकन् दोघे समोरासमोर उभे राहतात. सलाम्या, हुकूम झडतात, आणि दुसरा पहिल्यासारखा टपक टपक लचकत चालू लागतो" ( पृ. ३५ )

३) <u>विल्यम्सबर्गचा पुनरुध्दार -</u>

विल्यम्सबर्ग ही व्हर्जिनिया राज्याची वसाहतकालीन राजधानी. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतरच्या काळातील सध्याची व्हर्जिनियाची राजधानी रिचमंड आहे. रिचमंड राजधानी झाल्यानंतर विल्यम्सबर्ग हे एक जुनाट , उपेक्षित गाव झाले. अलिकडच्या काळात अमेरिकेचे प्रख्यात क्रोडोपति रॉक फेलर यांनी लक्षावधि डॉलर्स खर्च करून विल्यम्सबर्गचा पुनरुध्दार केला आहे. अठराव्या शतकांत वसाहतकालीन विल्यम्सबर्ग जसे होते तसे ते पुन्हा करण्यात आले आहे. त्या काळात होते तसे रस्ते, घरे, इन्स किंवा खानपानगृहे वगैरे साफसूफ करून जशीच्या तशी करण्यात आली आहेत" जुन्या काळातल्या " रेड लायन इन " ,"ब्लॅक कॅट इन " अशासारख्या दरवाजावरच्या दांडीवर लोंबणाऱ्या सचित्र पाट्या पुन्हा लटकल्या आहेत. कांही विशिष्ट वेळ सोडल्यास रस्त्यातून मोटार नेण्याचीही बंदी आहे. अठराव्या शतकांतला

गव्हर्नरचा वाडा, चर्च, त्याच्या यल्लागार मंडळाच्या किंवा कौन्सिलच्या बैठकीच्या जागा वगैरे जुन्या इमारती आंतल्या टेबले, खुर्च्या, झुंबर इत्यादि सर्व वस्तूसह चकचकीत करून ठेवले आहे. ( पृ. ४३ )

विल्यम्सबर्ग पाहयाला मुद्दाम येणाऱ्या प्रवाशांना " आपण अठराव्या शतकातंच वावरतो आहोत असे वाटावे म्हणून या जुन्या इमारतीत वावरणाऱ्या नोकर-चाकरांना अठराव्या शतकातले इंग्रज वापरीत त्याच तऱ्हेचे कपडेही दिलेले आहेत.

४) ख्राइस्ट चर्च - प्रार्थना मंदिर -

जुनाट चिमुकल्या चर्च मध्ये बसायची बाके, धर्मगुरूचे व्यासपीठ वगैरे सर्व काही चकचकीत ठेवले आहे. " वॉशिंग्टनचा आणि रॉबर्ट ली चा "प्यू " किंवा बसायची राखीव जागा तिथल्या माणसाने दाखवली. या चर्च जवळच्याच शाळेत वॉशिंग्टन जात असे " ( पृ. ३४ ) चर्च आवारात अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुध्दांत देह ठेवलेल्या कांही वीराची थडगी आहेत.

न्यूयॉर्कला जाणाऱ्या प्रवाश्याने पाहिल्याच पाहिजेत अशा दोनतीन गोष्टी म्हणजे उंच इमारत एकशेदोन मजल्यांची एम्पायर स्टेट बिल्डिंग, न्यूयॉर्क बंदराच्या तोंडाशीच असलेल्या बेटावरला "स्टॅच्यू ऑफ लिबर्टी किंवा स्वातंत्र्य-देवीचा पुतळा.

एम्पायर स्टेट बिल्डिंग -

एम्पायर स्टेट बिल्डिंगच्या एकशेदोन मजल्यांच्या छपरावरच्या काचेच्या गच्चीवरून संबंध न्यूयॉर्क चे एका बाजूची ईस्ट रिव्हर, दुसऱ्या बाजूची हडसन रिव्हर, मॅनहॅटनवरच्या गगनभेदी इमारतीचा पुंजका ,सेंट्रल पार्क, बुकलीन, क्वीन्स इत्यादि न्यूयॉर्कचे दूरदूरचे भाग इत्यादिचे दर्शन होतेच पण न्यूयॉर्क राज्याच्या जवळच्याच न्यू जर्सी ,कॉनेक्टिकट मॅसाचुसेटस, पेन्सिल्व्हेनिया या राज्याच्या कांही भागाचेहि अंधुक दर्शन होते. या इमारतीची उंची १४७२ फूट आहे पण एकशे दुसरा मजला १२५० फुटावर आहे. शहाऐंशीवा मजला १०५० फुटावर आहे.

पण इथल्या अनेक एलेव्हेटर्स पैकी एक्स्प्रेस एलेव्हेटर अवघ्या एका मिनिटात तळमजल्यावरून एकशे दुस-या मजल्यावर घेऊन जातो.

स्टॅच्यू ऑफ लिबर्टी - ( स्वातंत्र्यदेवीचा पुतळा )

आयलंड बेटावर या स्वातंत्र्यदेवीचा जळती मशाल मुठीत धरून वर उचललेला हात बेचाळीस फूट लांबीचा आणि बारा फूट जाड आहे आणि प्रत्येक डोळ्याची रुंदी अडीच फूट आहे. यावरून हा पुतळा केवढा अजस्त्र आहे याची कल्पना येईल " ब्रिटनचे जू झुगारून देऊन अमेरिका स्वतंत्र झाली तेव्हा फ्रेंच जनतेने हा तांबे आणि ब्रॉन्झ धातूचा १५२ फूट उंचीचा पुतळा पॅरिसमध्ये घडवून नवोदित अमेरिका या राष्ट्राला नजर केला " ( पृ. १३७ )

त्याच्या पोटातून वर डोक्यापर्यन्त जायाला लोखंडी जिना आहे किंवा एका लहानशा एलेव्हेरटरनेहि वर जाता येते.

व्हिजिटर्स पार्टिसिपेशन म्युझियम -

"म्युझियम ऑफ सायन्य ॲन्ड इन्डस्ट्री " हे अचाट वस्तुसंग्रहालय.

चांगल्या चांगल्या प्रौढाना एका एका दालनातून हालूच नये असे वाटायला लावणारी, एकाहून एक डोळे दिपवून टाकणारी दालने या म्युझियममध्ये आहेत. कित्येक दिवस पुन्हा पुन्हा येऊन हे म्युझियम पाहिले पाहिजे असे आहे.

या म्युझियमला " व्हिजिटर्स पार्टिसिपेशन म्युझियम " असे नांव आहे. इतर " प्रदर्शनात आणि संग्रहालयात पाहयाला येणारांनी इथे हात लावू नये, तिथे बोट ठेवू नये अशी सक्त ताकीद जिथे तिथे दिलेली असते. इथे या उलट प्रकार आहे. म्युझियम पाहयला येणा-या मुलानी इथली यंत्रे, इथल्या वस्तू, इथल्या नमुन्यांना हात लावावा, ती चालवून पहावी, तिथल्या खास

मार्गदर्शकाचे साहाय्य घ्यावे, तिथले बटन दाबून टेपरेकॉर्डवरून विशिष्ट नमुन्याची माहिती ऐकावी असे इथे मुद्दाम बजावण्यात आले आहे"( पृ. १२९)

एका दालनात प-यांच्या नंदनवनात गेल्यासारखे वाटते चिमुकले रंगी-बेरंगी राजवाडे, किल्ले, गड करून त्यांच्यात ठिकठिकाणी मोठ्या कलापूर्ण रीतीने या बाहुल्या ठेवल्या आहेत.

"या निरनिराळ्या प्रकारच्या सुंदर बाहुल्या हॉलिवुडमधल्या एका नटीला निरनिराळ्या प्रकारच्या सुंदर बाहुल्या संग्रह करण्याची हौस होती तीने या संग्रहालयाला देऊन टाकल्या". ( पृ. १२९ )

<u>आर्ट इन्स्टिट्यूट -</u>

या इन्स्टिट्यूटमध्ये जुन्यानव्या मोठमोठ्या चित्रकारांच्या आणि शिल्पकारांच्या कलाकृति आहेत. पिकासो, रेन्वा वगैरेच्या कृति आहेत.

"याच जागेत साठसत्तर वर्षापूर्वी जागतिक सर्वधर्म परिषद झाली होती, तिथे स्वामी विवेकनंदानी आपले जग जिंकणारे इतिहासप्रसिध्द भाषण केले "( पृ. १२२ )

त्यानंतर या इमारतीत कांही फेरफार झाले आहेत.

<u>न्यूयॉर्कची श्वार्टझ कंपनी -</u>

जगांतल्या उत्कृष्ट बाहुल्या मिळण्याचे ठिकाण श्वार्टझ मधली बाहुली अशी कांही विशिष्ट पदार्थाची केलेली असते की हाडमांसाच्या मुलाला जस आपण सांभाळून धरतो आणि सांभाळून जमिनीवर ठेवतो तसेच या बाहुलीलाही सांभाळून घ्यावे लागते. नटीला किंवा नटाला ख-या मुलासारखीच या मृदुमांसल बाहुलीला धरावी लागेल, तेव्हा अभिनय चुकीचा किंवा हास्यास्पद होण्याचा प्रश्नच नाही.

श्वार्टझच्या दोन मजल्यावरल्या भव्य दालनांतल्या लहान मोठया बाहुल्या इतर खेळणी आणि ह-या जिराफा एवढे जिराफ, कुत्री, मांजरे वगैरे पाहता पाहता मोठयांना दुकानाबाहेर पडावेसे वाटत नाही,

"इथल्या बाहुल्याचा एक विशेष म्हणजे त्यांच्यात ठोकळ्यांसारखा सारखेपणा मुळीच नव्हता एखादया बागेत आपण सुंदर, गुटगुटीत, गुलाबी गालांची मुले खेळताना पाहतो तेव्हा ती सर्वच सुंदर आणि गुटगुटीत दिसतात पण एकहि दुस-यासारखी नसते. प्रत्येकाचा चेहरा, केस, कपडे निराळे तसे या बाहुल्याचे होते" ( पृ. १३९ )

काणेकरांनी प्रवासात पाहिलेल्या अनेक गावातील स्थळे, इमारती, मंदिरे ऐतिहासिक वास्तू याचे वर्णन केले आहे. "प्रवासवर्णनिकाराच्या लेखननिर्मितीत त्याचे संवेदनक्षम मन, त्याची अपूर्व अशी निरीक्षणशक्ती, तीव्र स्मरणशक्ती आणि उत्कंठता या सर्वच मानसिक गुणाना आव्हान असते"[६] कारण एकाचवेळी भावलेले, धावत्या क्षणी प्रवासात पाहिलेले आठवणी महत्वाचे असते ते आठवून जाणिवेच्या स्तरावर जाऊन उत्कंटपणे व्यक्त करणे हे कौशल्यच असते. त्यावरून काणेकरांची निरीक्षण शक्ती आणि रसिकवृत्ती किती सूक्ष्म होती हे लक्षात येते.

सामाजिक परिस्थिती-

अमेरिकेत वास्तव्य असणा-या लोकांत अनेक वंशाचे लोक आहेत, त्या पैकी होपीइंडियन, जपानी, चिनी, भारतीय, मॉर्मन पंथीय, यांकी इ. लोक आहेत.

१० मॉर्मनपंथीय लोक --

खिश्चन धर्मीयच हे लोक आहेत. आणि बायबल हाच त्यांचा धर्म ग्रंथ आहे. इतर कोणाही अदयावत गो-या अमेरिकन माणसांसारखीच ही माणसे आहेत. अमेरिकेतील युटाराज्यच प्रख्यात मॉरमॉन पंथाच्या लोकांनी वसविले आहे " आपल्या महाराष्ट्रात जसे महानुभाव किंवा नाथपंथीय असे प्रकार आहेत तसाच अमेरिकेतल्या खिश्चन धर्मीयाचांच हा एक प्रकार आहे".

13202
A

बुक ऑफ मॉरमॉन " हा त्यांची खास धर्म तत्वे सांगणारा एक ग्रंथ आहे " आपल्याकडच्या महानुभाव पंथीयाप्रमाणेच या लोकाबद्दल अनेक गैरसमज होते आणि त्यांचा छळही खूप झाला कारण ख्रिस्तीधर्म निषिद्ध अशी एक चाल प्रारंभी प्रारंभी या लोकांत होती ती म्हणजे एका पुरूषाने अनेक बायका करण्याची " ( पृ.७८ ) त्याचप्रमाणे या लोकांचे शंभर वर्षांहून जुने असे सॉल्टलेक सिटीमध्ये टेंपल स्क्वेअर या भागात जे चर्च आहे त्याला ते टेंपलच म्हणतात त्यात मॉरमॉन नसलेल्या कुणालाही प्रवेश नाही.

कौटुंबिक जीवन –

कौटुंबिक जीवनाला मॉर्मन फार महत्व देतात म्हणून अनेक बायका व मुलेबाळे हवीत अशा कल्पनेने कांही मॉर्मन बहुपत्नीकत्वाला उचलून धरीत असत पण " १८९० साली चर्चे मॉर्मन अध्यक्ष वुड्रफ यांनी एक जाहीरनामा काढून बहुपत्नीकत्वाला बंदी केली. तेव्हापासून सर्व मॉर्मन एकपत्नीत्वाच्या देशातल्या कायद्याचे कसोशीने पालन करतात" ( पृ. ७९ )

दारू किंवा तंबाखूच काय पण चहा किंवा कॉफीलाहि मॉर्मन स्पर्श करीत नाहीत.

३) परस्पर साहाय्य व उद्योगशीलता –

परस्पर साहाय्य आणि उद्योगशीलता हे एक मॉर्मनांचे वैशिष्टय आहे " आठवड्याचे कांही तास, मॉर्मन विद्यार्थी ,वकील, डॉक्टर,उद्योगपति, व्यापारी प्रत्येक जण मॉर्मनांच्या अनेक सहकारी उद्योगभवनापैकी एखाद्यात जोडे शिवण्याचे, बाटल्या भरण्याचे ,डबे पॅकबंद करण्याचे असे " ( पृ.७९ ) जमेल ते काम विनावेतन करीत असतो. या उद्योगभवनांत होणा-या वस्तु अगदी स्वस्त किंमतीत किंवा फुकट गरीब,गरजू मॉर्मन कुटुंबांना देण्यात येतात.

४) मॉर्मन पंथाचा इतिहास -

या मॉर्मन पंथाचा इतिहास अगदी अलिकडचा म्हणजे शेसव्वाशें वर्षांचा आहे. आपल्यापंथाला हे लोक " चर्च ऑफ जीझस ख्राईस्ट ऑफ लॅटर डे सेन्टस " म्हणतात. या पंथाचा प्रवर्तक आणि पहिला प्रेषित प्रॉफिट जोसेफ स्मिथ याला १८२० साली प्रकाशाचा एक स्तंभ दिसला आणि आपण प्रेषित असल्याचा साक्षात्कार झाला.

जोसेफ स्मिथने हा नवा पंथ १८३० साली न्यूयॉर्क राज्यात फायेत् येथे प्रवर्तित केला तेव्हा त्याला फक्त सहा अनुयायी होते. १८४४ साली इलिनॉय राज्यांतल्या कार्थेत गांवी जोसेफ आणि त्याचा भाऊ हायरम या दोघांचा मॉर्मनाना हुसकावून लावू पाहणाऱ्या लोकांच्या जमावाने खून केला. आपला खून होणार हे भाकीत जोसेफने आधीच जाहिर केले होते" मॉर्मन स्त्री-पुरूष ,मुलें, कुटुंबे एकएका राज्यातल्या छळाला कंटाळून एक सारखी प्रदेशांतर करीत होती अशा हजारों स्त्री-पुरूषमुलांचा एक जथा घेऊन त्यांचे दुसरे प्रेषित डॉ. ब्रिद्यम यंग मिठाची तळी आणि ओसाड प्रदेश असलेल्या यूटा राज्याच्या सॉल्टलेक खोऱ्यात १८४८ त येऊन पोहोचले. यूटा राज्याचा प्रदेश मॉर्मनांच्या परिश्रमानीं सुजाल,सुफल,सस्यशामल झाला आहे" ( पृ.८१ )

५) टोळधाड आणि समुद्र पक्षी -

सॉल्टलेक सिटीच्या जवळच एक भव्य दगडी स्मारक उभे केले आहे. मोठया कमानी खाली हात वर करून डॉ. ब्रिद्यम यंग उभे आहेत " थकलेली घोडी, थकलेले स्त्री-पुरूष - मुले यांचे दोन गट स्मारकाच्या दोन टोकांना आहेत. कमानीवर " This is the place " ही अक्षरे कोरली आहेत" ( पृ. ८१ )

१८४८ मध्ये एक मोठा चमत्कार झाला मॉर्मन कुटुंबांनी पेरलेले धान्य चांगले तरारून वर आले होते इतक्यात एक मोठी टोळधाड तिथे आली ती

धान्यावर बसणार इतक्यात समुद्रावर नेहमी घिरट्या घालतात त्या पांढ-या शुभ्र हजारों पक्षयाचे थवे तिथे कुठून कसे आले कुणाला ठाऊक ते आले आणि त्या टोळ्याना त्यानी नष्ट केले. त्या विस्तीर्ण आवारात समोरच सुंदर कोरीव काम केलेला भव्य दगडी स्तंभ आणि त्याच्यावर पांढ-या समुद्र पक्षयांच्या थव्याचे शिल्प दिसते १८४८ मधल्या त्या प्रसंगाचे हे स्मारक आहे( पृ.८२ )

होपी इंडियन -

रेडइंडियनाच्या अनेक जमाती आहेत, त्यापैकी होपी इंडियनाचे हे " होपी हाऊस " या गढीवजा ओबडधोबड घरात रेडइंडियनानी विणलेल्या शाली,कपडे मण्याचे कमरपट्टे वगैरे वस्तू विकायला ठेवलेल्या होत्या" ) पृ.६१ ) रोज संध्याकाळी पाचच्या सुमाराला होपी इंडियन पुरूष आणि स्त्रिया हॉटेलसमोरच्या एका ओट्यावर रंगीबेरंगी पिसाच्या टोप्या घालून आणि हातविणीची रंगीबेरंगी कपडे कमरेला गुंडाळून मोठमोठ्या ढोलांच्या तालावर आपल्या भाषेतल्या गाण्यांची ओरडा-आरड करीत नाच करून दाखवतात.

प्रा.अनंत काणेकरानी अमेरिकेतील मानवी उच्चाराचेही सूक्ष्म निरीक्षण केलेले आहे ते म्हणतात, " आपण जसा बोलण्याच्या धाटणीवरून अमका घाटावरचा अमका कोंकण्या, अमका व-हाडी,अमका खानदेशी हे ओळखतो तसे अमेरिकेतही आहे.उत्तरेकडले म्हणजे " यांकी" जबडा रूंद पसरून आणि नाकांत फार बोलतात, दक्षिणेकडल्याचे इंग्रजी अधिक पारंपारिक आणि जुने असतात."( पृ.३९ )

न्यू अर्लियास हे शहर जुन्या काळात फ्रेंचानी वसविले . लुईसियाना राज्याची राजधानी एकेकाळी रचनेच्या वर्चस्वाखाली होती नंतर अमेरिकेने ते शहर घेतले, त्यामुळे अजूनही इथे फ्रेंच क्वार्टर, स्पॅनिश क्वार्टर, क्रियोल या मिश्र वंशीयांचा क्रिओल क्वार्टर असे शहराचे काही भाग आहेत. न्यू ऑर्लियस लोकात सँगरॅक नावाचा एक कॉकटेलचा खास प्रकार प्रिय आहे.

अमेरिकनांचे आदरातिथ्य -

कांही प्रसंगाच्या माध्यमातून काणेकरांनी अमेरिकनांच्या आदरातिथ्यावर प्रकाश टाकला आहे.

जगात सर्वत्र अनुभवाला येणारे जातिवंत शेतक-यांचे आदरातिथ्य या अमेरिको शेतक-यांच्या घरीही अनुभवाला आलेच. कांही तरी खाल्ल्याशिवाय फलावरी स्मिथ कुटुंब आम्हाला जाऊ देईना. सुग्रण स्मिथबाईनी भट्टीतून नुकतेच बाहेर काढलेले गरम गरम छोटे पाव आणि काकवी सारखा दिसणारा आणि तसाच गोड मेपल झाडाचा " सॉरगम " मद्य वाडगे भरून आमच्यासमोर टेबलावर ठेवला" नको नको म्हणत आम्ही गरम गरम चार-चार पाच-पाच पाव आणि वाडगा-वाडगा मद्य सहज फस्त करून टाकला" ( पृ. ११६ )

रस्त्यात हॉटेलात विमानात भेटणारे किती तरी अमेरिकन स्त्री-पुरूष मुद्दाम ओळख काढून आम्हाला विचारीत " तुम्हाला आवडला ना आमचा देश ? आमच गाव कसं आहे ? " ( पृ. १७ ) छान आहे। असं आम्ही म्हटल की त्याना मनापासून आनंद होई आणि अगदी मनापासून ते म्हणत " आमच्या शहरात तुम्ही परत आलं पाहिजे हं। " (पृ. १७ )

भारतीयाबद्दल आत्मीयता -

अमेरिकेच्या प्रवासात काणेकराना ठिकठिकाणी भारताबद्दल अपूलकी दिसून आली उदा. फ्रिस्कोतला न्हावी म्हणतो " तुमच्यासारख्या भल्या लोकावर या चिन्यानी काय म्हणून हल्ला केला हो ? " ( पृ. ६८ ) तर शिकागोतल्या क्लबांत ग्लास फस्त करीत बसलेला तरूण काणेकराना विचारतो " तुम्ही भारतातून आला आहात का ? हो म्हटल्यावर तो पुन्हा पुन्हा विनवणीच्या स्वरात सांगू लागला "This is no America"ही अमेरिका नव्हे बर स्वदेशा-स्वदेशी गेल्यावर अमेरिका अशी आहे म्हणून कृपा करून सांगू नका " ( पृ. १३१ ) अशा अनेक उदाहरणावरून तिथे भारतीयाबद्दल असलेला आदर दिसून येतो.

चिनी-भारतीय युध्दाच्या बातम्या येऊन धडकल्या तेव्हा काणेकरासमोर असलेल्या पत्रकारापैकी कित्येक तर आपण भारताला लगेच परत जाऊ या म्हणू लागले " हॉटेलात किंवा रस्त्यात भेटणारे अमेरिकन मित्र हसून सांगू लागले आता आपणाला दोघानाही लढायचंय बडया भाईचा म्हणजे रशियाचा आम्ही समाचार घेतो तुम्ही छोट्या भाईचा म्हणजे चीनचा समाचार घ्या "( पृ. २८ ) चीन-भारत युध्दासंबंधी अमेरिकेचा हात मदतीचा होता " कम्यूनिस्ट चीनला अमेरिकेचा पहिल्या पासूनच विरोध आहे "( पृ. २९ ) असिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. टॅल्बट यांच्याशी वॉशिंग्टनमध्ये झालेल्या मुलाखतीत ते म्हणाले " तुमच्या अलिप्ततावादाशी किंवा नॉन अलाइनमेंटशी आम्हाला कांही एक कर्तव्य नाही. तुमचे राजकारण तुम्हीच केलं पाहिजे पण आम्ही भारताला मित्र राष्ट्र समजतो" ( पृ. ३९ ) यावरून भारतीया बद्दलची आत्मीयता दिसून येते.

अमेरिकेतील शिक्षणपध्दती -

ब्रिद्यम यंग युनिव्हर्सिटी -

बी.वाय.यू. या छोट्या नावाने ती युटा राज्यात प्रसिध्द आहे. "विद्यापीठाच्या निरनिराळ्या खात्यांच्या जणु काय कालच बांधून झाल्यात इतक्या चकचकीत इमारती ठेवल्या आहेत " ( पृ. ८२ )

या युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसवर सुमारे बारा साडेबारा हजार विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि सहाशे प्राध्यापक आहेत. या स्टेडियमध्ये मधल्या व्यासपीठाच्या सभोवार चढत्या पाय-यांच्या आसनांवर दहा हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी बसू शकतात.

कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी -

अमेरिकेचे हे एक फार मोठे व प्रख्यात विद्यापीठ आहे. फ्रिस्को जवळच दहा-पंधरा मैलावर बर्कले येथे जवळजवळ बारा हजार विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे उच्च शिक्षण देणा-या या विद्यापीठाचे कार्य क्षेत्र पसरले आहे.

या विद्यापीठाचे बर्कले, लॉसएंजेलीस वगैरे मिळून कॅलिफोर्नियात प्रत्येक ठिकाणी हजारों विद्यार्थी असलेले सात कॅम्पस आहेत.

विद्यार्थी-

"आमच्या विद्यार्थ्यांच्या मानाने चांगले धिप्पाड दिसणारे शेकडो विद्यार्थी आणि विद्यार्थीनी काखेत पुस्तकांचे गठ्ठे किंवा वह्या घेऊन इकडून तिकडे जाताना दिसतात. कॅम्पस मध्ये शिरल्याबरोबर " स्टुडंटस युनियन च्या भव्य इमारती शेजारीच असलेल्या एका कारंजाच्या काठावर बसून मुलींच्या हातात हात घालून गुलगुलु गोष्टी करीत बसलेले दिसले "

"आमच्या पैकी काही हिंदी, बिहारी वगैरे मित्राना ही मुलामुलींची सलगी कशीशीच वाटली" ( पृ.६९ )

होम कमिंग डे -

या विद्यापीठाचे कॅलिफोर्नियात ठिकठिकानी जे सात कॅम्पस आहेत, तिथले अधिकारी आणि कांही विद्यार्थी-विद्यार्थीनी ( होम कमिंग ऑफ ऑल कॅम्पस ) या दिवशी बर्कले या मुख्य कॅम्पसमध्ये एकत्र येतात. तिथे फिरणा-या कांही विद्यार्थी विद्यार्थीनीच्या स्वेटरवर ( U.C.L.A.) अशी अक्षरे दिसत होती. "उक्ला" म्हणजे युनिव्हर्सिटी कॅम्पस ऑफ लॉस एंजेलीस .

बॅन्डचा ताफा -

बॅन्डचा ताफा आणि नाचणा-या मुली घेऊनच " उक्ला" मंडळी आली होती. " हां हां म्हणता पलीकडल्या मोकळ्या जागेत उक्ला बॅन्ड सुरू झाला आणि रांगेत उभी राहून मुले-मुली हातपाय उडवून नाच सुरू करू लागली. एक मुलगा मोठ-मोठ्याने आपल्या कॅम्पसच्या घोषणा देत होता व इतर त्याला साथ देत होती" ( पृ.७०)

आयोवा विद्यापीठ -

पुण्यासारखी किंवा ऑक्सफर्ड , केंब्रिजसारखी आयोवा सिटी हे मुख्यत्वेकरून विद्यापीठाचेच गांव आहे. स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ आयोवाचा "कॅम्पस" किंवा क्षेत्र चारशें एकराचे होते, ते वाढत वाढत बाराशे एकरांइतके पसरले आहे. वार्षिक अंदाज-पत्रक पाच साडेपांच कोटि डॉलराचे आहे. निरनिराळ्या शाखांच्या विद्यार्थ्यांची संख्या बारा हजारपर्यन्त आहे.

नाट्यशिक्षण-

जीवनात आणि नाटकांत शब्दाला-वाणीला विशेष महत्व असल्यामुळे युनिव्हर्सिटीच्या या विभागाचे नांव "डिपार्टमेन्ट ऑफ स्पीच अँन्ड ड्रॅमॅटिक आर्ट " असे आहे.

युनिव्हर्सिटीचे एक भव्य सुंदर रंगमंदिर आहे " या मंदिरात जुन्या ग्रीक नाटकापासून तो शेक्सपियर, इब्सेन यांच्या नाटकापर्यन्त नव्हे तर अगदी अलिकडल्या आन्हुई, बेकेट, आयेनेस्को यांच्या नवनाट्य-ननाट्यापर्यन्तची सर्व प्रकारची दहापंधरा नाटके युनिव्हर्सिटीच्या या विभागाचे विद्यार्थी दर वर्षी करून दखिवतात" ( पृ. १११ )

या विभागातर्फे बी.ए.,एम.ए.,पीएच.डी.पर्यन्तच्या पदव्या दिल्या जातात. रंगभूषा, वेशभूषा,नेपथ्य,प्रकाशयोजना,अभिनय, दिग्दर्शन, निर्मिती इत्यादी विषयाचे व्याख्याते अभ्यासक्रम आहेत.

पत्रव्यवसाय-

विद्यापीठ पत्रव्यवसाय विभाग आहे. एक मोठा छापखाना आहे. संपादकीय कचे-या आहेत. या विभागातर्फे " आयोवा सिटी प्रेस सिटिझन" नावाचे दैनिक पत्र काढण्यात येते ते आयोवात अतिशय लोकप्रिय असून त्याचा खपहि मोठा आहे. बातम्याचे संपादन, अग्रलेखन वगैरे वृत्तपत्रव्यवसायाच्या सर्व बाजूचे इथे नुसते पुस्तकीच नव्हे तर व्यवहरिक शिक्षणही देण्यात येते " ( पृ.११२ ) विद्यार्थ्यांना रिपोर्टर म्हणून

बातम्या आणाव्या लागतात त्याचे संपादन करावे लागते, रात्रपाळ्या कराव्या लागतात सर्व कांही प्रत्यक्ष करावे लागते.

वसतिगृहे -

विवाहित विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी वसतिगृहे आहेत." लग्न करून अभ्यास चांगला होतो अस अलीकडे आमच्या पोरापोरींना वाटू लागलय-आम्हीही त्यांना उत्तेजन देतो अस चकू सांगत " ( पृ.११३ )

रेडइंडियनाची शाळा -

एक मोठी थोरली पांढ-या रंगाची शाळेची इमारत आणि प्रशस्त आवार कांही मुले आवारात खेळत होती, काही हातात हात धरून शिस्तीने आत जात होती. शर्ट पॅन्ट किंवा फ्रॉक आंगावर असले तरी सिक्कीम भूतान किंवा नेपाळसारख्या आमच्या कडच्या पहाडी मुलुखातल्या मुलाइतकीच तांबूस काळ्या रंगाची बसक्या चेहे-यांची आणि बारीक डोळ्यांची ही मुले होती ॲरिझोनात रेडइंडियनाच्या पुष्कळ वसाहती आहेत.

शाळेतल्या लहान मुलांची बस -

शाळकरी मुलाच्या बस गाडयाना ठराविक ( नारिंगी ) रंग असतो. समोर एखादी अशी बस उभी दिसली की सर्व मोटारवाल्यांनी आपल्या गाडया अर्धा मिनिट तरी जागच्या जागी थांबल्या पाहिजेत असा कायदा आहे.

"अमेरिकेच्या लांबरूंद हाय-वे वरून मोटारी कमीत कमी ऐंशी-नव्वद मैलांच्या वेगाने जात असतात. शाळेची बस उभी राहिली की खाली उतरल्यावर लहान मुले कुठे कसे धावतील त्याचा नेम नसतो म्हणून हा नियम केला आहे " ( पृ.४५ ) आणि सर्व लोक तो नियम पाळतात.

चित्रकला -

पेन्टगॉन-

एका दालनात चित्र फलक ,रंगीत चित्रांच्या कांचा इ. ची मांडणी करून पाहुण्यांना अमेरिकेच्या शास्त्रबळाची कल्पना देण्याची व्यवस्था केलेली आहे.

नॅशनल आर्ट गॅलरी -

या गॅलरीच्या भव्य इमारतीत पंधराव्या शतकापासून ती आजतागायतचा मोठ मोठ्या चित्रकारांच्या भव्य कलाकृती आहेत.

अमेरिकेचे एक कोट्याधीश मेलॉर यानी जगातल्या काही अमोल चित्रांचा संग्रह या गॅलरीला भेट दिला आहे. त्या साठी त्यानी लाखों डॉलर्स खर्च केला आहे. एवढेच नव्हे तर आणखी कित्येक डॉलर्स खर्च करून तो संग्रह ठेवण्याकरिता दालने बांधून दिली आहेत.

या गॅलरीचा विशेष हा की ज्या काळांतली चित्रे आहेत त्याला अनुरूप अशी दालनांची रचना आणि स्वरूप आहे. नॅशनल आर्ट गॅलरी पाहून काणेकर म्हणतात " मनावरले ओझे उचलल्यासारखे होऊन बरे वाटले " ( पृ. ३७ ) काणेकरांना दालनातील प्रत्येक चित्राचा इतिहास डॉ. रेमंड स्टाइट्स हे वयोवृध्द रसिक गृहस्थ समजावून सांगणारे होते.

न्यू ऑर्लियास -

अलिकडच्या काळात गाजलेला अमेरिकेचा प्रख्यात नाटककार टेनेसी विल्यम्स इथलाच तरूण लघुकथालेखक टुमन कपोटे याच गावातला या लेखकांच्या कथा नाटकांतली अमेरिकेच्या या दक्षिण प्रदेशातली जुनी घराणी, त्यांचे वंशाभिमान, तिथल्या केळी, अननस, तरारून पिकणा-या उष्ण हवेत या स्त्री पुरूषाच्या जीवनात उसळणारी तप्त भावनांची वादळे अशा अनेक गोष्टी काणेकराना न्यू ऑर्लियासकडे जाताना आठवत होत्या.

अमेरिकेतील क्रीडा-करमणूक -

अमेरिकेत फुटबॉल खेळाचे एक वेगळेपण जाणवते. पायाखेरीज सर्व शरीराने हा खेळ खेळतात.असे दिसते. खेळाडू चिलखत, शिरस्त्राण घातलेले असतात. खेटाच्या

वेळी विद्यार्थीनी तंग कपडे घालून नाचतात. कवायिती करतात. प्रेक्षकांची व खोळांडूची करमणूक करतात. काही विद्यार्थी विदूषकासारखी कपडे घालून आरडा-ओरड करतात.

स्ट्रिप-टीझ नाईट क्लब -

हा नाईट क्लब पहिल्यानंतर काणेकर म्हणतात " कुणी कुणाला हंसण्याचे फारसे कारण आहे, असे मला वाटत नाही" ( पृ.१३० ) आमच्या मुंबईच्या हॉटेलातल्या यूरोप-अमेरिकेतल्या किंवा इजिप्त - इराणामधल्या अंगप्रत्यंग पिळवटून नाचणा-या मुली, तीन चतुर्थांश, चार पंचमांश किंवा अर्धनग्न असतात, तर इथल्या नग्नप्राय असतात असे म्हणता येईल.

"मुंबईतल्या नर्तिकांच्या अंगावर छाती भोवती तीनचार बोटे रूंदीची रेशमी जरतारी चिंधी आणि कमरे भोवती चारपाच बोटाची चिंधी असते तर शिकागोतल्या तिच्या बहिणीच्या अंगावर छाती भोवती ती दोन-तीन बोटाचीच असते इतकेच " ( पृ.१३१ )

अनंत काणेकर या स्ट्रिप टीझ चे वर्णन स्वयंवस्त्राहरण असे करतात कारण " नर्तिका संगीताच्या तालावर ठुमकत रंगमचांवर येते तेव्हा तिचे सर्वांग सुंदर झग्याने आवृत असते, इतकेच नव्हे तर वर आणखी सुंदर झुळझुळीत शाल लपेटलेली असते. नाचता नाचता हळूहळू शाल, झगा असे एकेक वस्त्र टाकून देत शेवटी फक्त उंच टाचेचे बूट आणि दोन चिंध्या एवढ्या किमान कपडयात नाचत राहते ( पृ.१३१ )

न्यूयॉर्कचा मवालीपूरा ( बॉवरी )

जुनाट घरासमारच्या फूट पाथावर किंवा दारूच्या गुत्त्यासमोर उगाच इकडे तिकडे रेंगाळत असलेले मळकट कपडयांतले, डोक्यावर कापडी टोपी घट्ट ओढलेले, गळ्याभोवती मळके रंगीत रूमाल गुंडाळलेले, दाढीचे वाढलेले खुंट अधूनमधून चाचपीत असलेले बरेचसे मध्यवयस्क किंवा म्हातारे-कोतारे या भागात दृष्टीस पडतात.

या कलंदराना काम करायला नको,"त्याना खायला देऊ केलंत तर ते घेणार नाहीत,त्यांची उपासमार होत नाही.सॅल्व्हेशन आर्मी किंवा तत्सम संस्थेत असल्या बेकरराना फुकट खायाला देतात यांच्या जवळ गेलात तर डॉक्टर दोन डॉलर द्या म्हणून ते पैसे मागतील. कारण दारू कुठे फुकट मिळत नाही म्हणून त्याना पैसे हवे असतात" ( पृ.१३८ )

आंतरराष्ट्रीय स्नेहसंबंध --

आंतरराष्ट्रीय स्नेह संवर्धनाच्यादृष्टीने अमेरिकेतल्या काही कुटुंबांनी भारतातल्या मुलामुलींना एक वर्षभर आपल्या घरात ठेवायचे,त्यांच्या राहण्याचा, खाण्यापिण्याचा ,शिक्षणाचा खर्च आपल्या स्वत:च्या मुलाप्रमाणे करायचा,त्यादृष्टीने श्वेर्निक कुटुंब हे काम अगत्याने करते. भारतातील पुण्याची "इंडिया फाऊन्डेशन ही संस्था या मुलामुलींची निवड करून दरवर्षी त्याना अमेरिकेला पाठवते.

## प्रकरण - तिसरे

### संदर्भ टीपा

| | | |
|---|---|---|
| १) | भीमराव कुलकर्णी | -"ललित गद्य, प्रदक्षिणा<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०<br>पृ.आ. १९४१. पृ. क्र. ३५८. |
| २) | वा.ल. कुलकर्णी | -"काणेकर आणि त्यांचे प्रवासलेखन<br>काणेकर व्यक्ती आणि वाङ्मय,<br>प्रकाशक - सुरेश राऊत, मुंबई,<br>संपादक - अविनाश केळकर,<br>पृ.आ. १९५६, पृ.क्र.६९. |
| ३) | ततैव | -" ततैव, पृ.क्र.६८. |
| ४) | ततैव | -" ततैव, पृ.क्र. ७०. |
| ५) | भीमराव कुलकर्णी | -" " उनि " |
| ६) | डॉ. वसंत सावंत | - प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार,<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि<br>संस्कृती मंडळ, मुंबई,<br>पृ.आ. जाने., १९८७,<br>पृ.क्र. ४७. |